जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2021
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे सोमवारी ऑनलाईन युवा उद्योजकता विकास कार्यक्रम

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व भारतीय युवा शक्ती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. १६ ऑगस्ट रोजी एकदिवसीय ऑनलाईन युवा उद्योजकता विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात नवीन उद्योग सुरु करण्याबाबत व उद्योगाचे विपणन, उभारणी आदी विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/XJSfhfAYVWNQJq7s6 यावर नावनोंदणी करावी, असे आवाहन प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2021
पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ३ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सुरू असलेल्या उन्हाळी सत्र अंतिम वर्ष परीक्षेतंर्गत शुक्रवारी ३४३९ पैकी ३ हजार ४१९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली.

विद्यापीठातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. शुक्रवारी बी.कॉम. आयटी, बी.कॉम. बँक मॅनेजमेंट, बी.एस्सी.-बायोटेक, बीएस्सी.-शुगर टेक्नॉलॉजी, बीसीएस, बीएस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन, बॅचलर ऑफ ड्रेस मेकिंग, बीए-मल्टिमीडिया, मास्टर ऑफ व्हॅल्युशन, बीएस्सी.एम. एस्सी.-नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.ए., एम.एस्सी. (इंडस्ट्रीयल केमेस्ट्री, इनऑर्गेनिक केमेस्ट्री, अप्लाईड केमेस्ट्री) एम.एस्सी.-शुगर टेक्नॉलॉजी, एम.एस्सी.-मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट आदी विषयांच्या परीक्षा झाल्या. ऑनलाईन परीक्षेत विद्यार्थ्यांना अडचणी येऊ नयेत यासाठी परीक्षा विभागातील अधिकारी, कर्मचारी कार्यरत होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर
14 AUG 2021

लोकमत

# राष्ट्रगीताचा व्हिडिओ अपलोड करावा

**कोल्हापूर :** भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त 'आजादी का अमृतमहोत्सव' सुरू आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रानुसार सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी, विद्यार्थिनींनी देशाचे राष्ट्रगीत वैयक्तिक सादर करून त्याचा व्हिडिओ ( https: //rashtragaan.in ) या संकेतस्थळावर अपलोड करावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, को[illegible]
14 AUG 2021

लोकमत

# अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य हे कृतिशीलतेचा वस्तुपाठ

## अण्णासाहेब डांगे : ऑनलाईन मुलाखत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अठराव्या शतकाच्या नभोमंडळात अनेक मराठेवीर चमकत होते, त्याच पटलावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



शुक्रताऱ्यासारख्या उजळल्या होत्या. कृतिशीलतेचा आणि आदर्श राज्य कारभाराचा वस्तुपाठ म्हणून आपण त्यांच्या जीवनकार्याकडे पाहायला हवे, असे आवाहन माजीमंत्री अण्णासाहेब डांगे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त माजी मंत्री डांगे यांची 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि समकाळ' या विषयावर विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' वाहिनीवर विशेष ऑनलाईन मुलाखत घेण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

अहिल्यादेवी सत्ताधारी होत्या, राजकारणी धुरंधर होत्या. मात्र, सत्तेच्या चढाओढीत नव्हत्या. त्यांच्या जहागिरीत धान्याची कोठारे भरलेली असायची. मात्र, सर्व प्रजा जेवल्याची खात्री झाल्याखेरीज त्या स्वतः अन्नग्रहण करीत नसत. संस्कृती रक्षणासाठी त्यांनी देवळांना संरक्षण पुरविले. ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार व संरक्षण करण्याचे कार्य त्यांनी केले असे डांगे यांनी स्पष्ट केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी ही मुलाखत घेतली. डॉ. गोफणे यांनी प्रास्ताविक केले.

### नव्या पिढीने अनुकरणाची गरज

अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या कारकिर्दीत समाजहिताचे अनेक धाडसी निर्णय घेतले. त्यांनी घेतलेले आणि राबविलेले निर्णय अत्यंत मूलगामी, पथदर्शक स्वरूपाचे आहेत. त्यांचे कार्यकर्तृत्व नव्या पिढीने समजून घेऊन त्यांचे अनुकरण करण्याची गरज असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2021
सकाळ

# अहिल्यादेवी होळकर हा मराठेवीरांच्या नभोमंडळातील उजळता शुक्रतारा : डांगे

कोल्हापूर, ता. १३ : "अठराव्या शतकाच्या नभोमंडळात अनेक मराठेवीर चमकत होते. त्याच पटलावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शुक्रताऱ्यासारख्या उजळल्या होत्या," असे ज्येष्ठ नेते अण्णासाहेब डांगे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त डांगे यांची 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि समकाळ' यावर 'शिव-वार्ता' वाहिनीवर विशेष ऑनलाईन मुलाखत घेण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डांगे म्हणाले, "अहिल्यादेवी सत्ताधारी होत्या, राजकारणी धुरंधर होत्या; मात्र सत्तेच्या चढाओढीत नव्हत्या. पेशव्यांशी एकनिष्ठ होत्या; मात्र लाचारीने नतमस्तक होणाऱ्यांतल्या नव्हत्या. त्यांच्या जहागिरीत धान्याची कोठारे भरलेली असायची. सर्व प्रजा जेवल्याची खात्री झाल्याखेरीज त्या स्वतः अन्नग्रहण करीत नसत. त्यांचा खजिना सोन्या-चांदीने भरलेला असला तरी त्यांच्या स्वतःच्या अंगावर मात्र स्फटिकाच्या माळेशिवाय अन्य दागिना नसे. अहिल्यादेवी धार्मिक वृत्तीच्या होत्या; मात्र धर्मभोळ्या नव्हत्या. जीवनात लढाया टाळण्यास त्यांनी प्राधान्य दिले. चालून आलेल्या शत्रूला नामोहरम केल्याशिवाय त्या सोडत नसत. पुरुषांच्या बरोबरीने लढाया लढत असताना स्त्रीत्वाच्या मर्यादा मात्र त्यांनी सोडल्या नाहीत. त्या जेव्हा लढाईस जात, तेव्हा लुटणे अगर सत्ता प्रस्थापित करणे एवढाच त्यांचा उद्देश नसे, तर त्या भागाचा विकास करण्याची संधी मिळाल्याचे समाधान त्यांना असे."


अण्णासाहेब डांगे

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या कारकिर्दीत समाजहिताचे अनेक धाडसी निर्णय घेतले. हुंडाबंदी, सतीप्रथा यांच्याविरोधात त्यांनी आवाज उठविला. जलसंधारण, वृक्षलागवड, शिक्षण क्षेत्रांसाठी त्यांनी घेतलेले निर्णय मूलगामी स्वरुपाचे, पथदर्शक आहेत."

जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मुलाखत घेतली. डॉ. एम. टी. गोफणे यांनी स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2021
सकाळ

# ऑनलाईन युवा उद्योजकता विकास कार्यक्रम सोमवारी

टेंबलाईवाडी, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, भारतीय युवा शक्ती ट्रस्टतर्फे सोमवारी (ता. १६) एकदिवसीय ऑनलाईन युवा उद्योजकता विकास कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमात उद्योगाचे विपणन, उभारणी आदीवर तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/XJSfhfAYVWNQJq7s6 यावर नावनोंदणी करावी. अधिक माहितीसाठी अतुल एतावडेकर, महेश चव्हाण यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.